स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखा विद्याशाखे अंतर्गत
इतिहास विषयातील विद्यावाचस्पती पदवी संशोधन

“छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनीती-एक ऐतिहासिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

✻ संशोधक ✻

श्री.गुरजलवाड सुरेश नारायण

मो.9921437642

Email : surnaygurpbn@gmail.com

(अनुसूचित जमाती)

✻ मार्गदर्शक ✻

प्रा.डॉ.बावळे नितीन पांडुरंग

सहयोगी प्राध्यापक (इतिहास विभाग प्रमुख)

शारदा महाविद्यालय, परभणी

Email : bawalenitin@gmail.com

संशोधक मार्गदर्शक व इतिहास अभ्यास मंडळ सदस्य

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

✻ संशोधन केंद्र ✻

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

(RRC मार्च 2022)

“छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनीती – एक ऐतिहासिक अभ्यास.”

प्रस्तावना : –

छत्रपती शिवाजीराजे भोसले मराठी साम्राजाचे संस्थापक उत्कृष्ट योध्दा, सहिष्णू राजा, कुशल रणनीतीज्ञ, गुप्तनीतीज्ञ हेरनीतीज्ञ, युध्दनीतीज्ञ मध्ये पारगंत आणि जगातील सर्वोत्तम संघटक आणि व्यवस्थापक व रयतेचा जाणता राजा म्हणून आज त्याच्या कार्य कर्तत्वामुळे आपल्याला परिचित आहेत.

छत्रपती शिवाजीराजे ज्या काळात जन्मले तो कालखंड मध्ययुगाचा. ह्या कालखंडात संपूर्ण भारतात मोगलशाही आणि अदिलशाही, बरिदशाही, निजामशाही आणि कुतुबशाही या परकीय सत्तेने धुमाकुळ घातला होता. प्रकाश, शांती, स्थैयाची साधी किरणही लोकांच्या मनात दिसत नव्हती. तेव्हा एका प्रकाशमान ताऱ्यांचा जन्म झाला. तो दिवस 19 फेब्रुवारी 1630 रोजी एका सरदारकन्या माँ जिजाऊ साहेब आणि शहाजीराजे भोसले यांच्या पोटी झाला.

आज आपण 21व्या शतकातील माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात राहतो. आजही आपली लोकशाहीचे पाळेमुळे खोलवर तपासून पहिली तर शिवाजीराजेनी निर्माण केलेली अष्टप्रधान मंडल. या अष्टप्रधान मंडळात लोकशाहीची संसदची प्रतिकृती आपल्याला दिसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणतात मला संविधान लिहिताना काहीच अशक्य वाटत नव्हते कारण माझ्या नजरेत छत्रपति शिवाजी महाराजांचे आदर्श राज्यव्यवस्था आणि अष्टप्रधान मंडळ होते.

छत्रपती शिवाजी महाराजांना राज्य स्थापने करणे राजा होणे आणि राज्य चालविणे हा एवढाच संकुचित विचार नव्हता, तर एक आदर्श राज्यपध्दती कशी असावी. राजाचे कर्तव्य आणि जबाबदारी युध्दतंत्र आणि युध्दनीती, गुप्तहेर यंत्रणा कसे सक्षम असावे यांची स्पष्ट उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी राजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली व्यवस्था – स्वराज्य होय.

छत्रपती शिवाजी राजे खरे जाणावयाचे असल्यास सर्वप्रथम आपल्याला स्वराज्य

संकल्प, स्वराजजननी, राष्ट्रमाता, जिजाऊ यांचे विचाराचे बिज आपल्या मस्तिकात पेरावे लागेल. अर्थातच माँ साहेबांचे दुसरे रुप म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय

स्वराजाची मुहूर्तमेढ तोरणागडावरुन शिवरायांनी मानवतेची,समतेची, बंधुत्वाची तोरणे बांधली. तोरणा किल्ला जिंकल्यानंतर शिवाजा महाराजांनी आदिलशहाला कळिविले की तेथील वतनदार कर, नियमीत देत नाहीत. यामागे छत्रपती शिवाजी महाराजांचे मुत्सद्दीगिरीचे धोरण अवलंबिले होते. चाकणचा किल्ला विना रक्ताचा, थेंबही न गळता सहज आपल्या ताब्यात घेतला. शिवाजी महारांजाचे गुप्तहेर खाते किती सक्षम आणि जलद होते यावरुन आपल्याला दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांजवळ निवडक व विश्वासू अगदी बोटावर मोजण्याइतके मावळे होते. सुरुवातीस महाराजांजवळ सैन्य, पायदळ, घौडदळ, नौदल आणि कोणतीही सैन्य व शस्त्रसाठा नसताना सुध्दा अगदी मर्यादित साधनांचा वापर करुन आपल्या युध्दनीती, गुप्तहेर या तंत्राचा वापर करुन निजामशाहीचा बलाढय सरदार फतेह खानावर आपला फतेह (विजय) मिळविला.

छत्रपती शिवरायांची गुप्तहेर यंत्रनेचा आणि युध्दनीती तंत्राचा स्वराज स्थापनेत सिंहाचा वाटा होता. गुप्तहेर बाजु कधीही न दिसणारी पण त्याचे परिणाम स्पष्ट दिसणारे असतात.

नरहर कुरुंदकर यांच्या मते छत्रपती शिवाजी राजे मुलखी, कारभाराचा तज्ञ, कुशल सैनानी, युध्दतज्ञ होते आणि त्यांच्या प्रत्येक लढाईत, तहात रणनितीत गुप्तहेरांचे अनन्य साधारण महत्व होते.

गुप्तहेर खात्यांचे प्रमुख बर्हिजी नाईक हे होते. महाराजांच्या गुप्तहेर यंत्रणेमध्ये दोन ते तीन हजार (जासुस) मावळे होते. गुप्तहेरांच्या मदतीने अफजलखानाचा वध 1659, उबंरखिंडीची लढाई 1661, साहिस्तीखानाची फजिती 1663, सुरतेची पहिली लुट इ.स.1664, आगऱ्याहुन सुटका 1666, सुरतेची दुसरी लुट 1670 या सर्व महिमा यशस्वी होण्याचे एकमेव कारण म्हणजे महाराजाचे गुप्तहेर यंत्रणा जलद, विश्वासु आणि सक्षम होते हे सिध्द होते. गुप्तहेर यंत्रना आणि युध्दनिती हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचे गमक होते.

“छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनीती”

युध्द हा एक संघर्ष आहे. सामान्यत सशस्त्र दोन किंवा अधिक पक्षांचा समावेश असतो. हे देश किंवा लोकांच्या गणमधील सशस्त्र संघर्ष.

“गिरीदुर्ग, वनदुर्ग, कंटककिर्ण अरण्य, पाणथळ जागा, गिरीशिखरे, उंचसखल भूभाग हे प्रकाशयुध्दाने हाती लागत नाहीत. ह्यासाठी कूटयुध्द करावे”. असे कौटिल्याच्या अर्थशास्त्रात नमूद केलेले आहे. छत्रपती शिवरायांनी याच युध्दनीतीचा, कुटनीतीचा पुरेपुर वापर करुन शस्त्रुला पराभुत केले. आपण त्याला आज त्याला गनिमीकावा म्हणतो.

संख्येने सदैव कमी असलेला मराठा सैन्याला विजय प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी लढाईचे रणक्षेत्र अनुकुल निवडले. शत्रु जर आपल्या पेक्षा बलाढय असेल तर त्याला हेरुन, घेरुन, गाठुन जेरीस आणून विद्युत वेगाने चाल करून हल्ला करणे, काहीच न कळता शस्त्रुवर चाल करणे आणि पळ काढणे ह्या पध्दतीचा वापर करणे म्हणजेच शिवरायांची युध्दनीती, युध्दतंत्र होते. त्यालाच आपण गनिमीकावा म्हणतो.

छत्रपती शहाजी महाराजांकडून हा युध्दनीतीचा वारसा शिवरायांकडे आला. शिवाजी महाराजांनी बारा मावळ्यातला साथीदारांना सोबत घेऊन याच गनिमीकावा, युध्दनीतीच्या जोरावर स्वराजांची बीजे रोवली.

अहमदनगरचा सेनापती मलिक अंबरच्या सर्वात विश्वासू सरदारांमधील पुण्याचे मालोजी भोसले आणि विठोजी भोसले होते. या दोघा बंधु कडे मलिक अंबरने वेरुळची जहागिरी दिली होती. या दोन्ही तरुणांची क्षमता आणि कौशल्य ओळखुन मोठी मानाची पदे दिली. पुढे मालोजी भोसलेचे जेष्ठ पुत्र शहाजी भोसले देखील मलिक अंबरच्या पदरी रुजु झाले. तेथेच त्यांना या गनिमीकावा या युध्दपध्दतीची ओळख झाली. ह्याच वारसाच्या जोरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी बलाढ्य पाच शाहिच्यां लाखोंच्या सैन्याला सळो की पळो करुन त्यांच्या नाकात दम आणून सोडला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांचा युध्द लढण्याचा हा नविन तंत्र नसला तरी भारतीय प्रदेशासाठी अनुकुल युध्दनिती होती. या युध्दनितीमध्ये डोंगर, दऱ्या, पर्वत, शिखरे, जंगल, वने, झाडे झुडपे या भौगोलिक, सामाजिक, विषमता, आर्थिक कुवत विचारात घेऊन लाभलेल्या प्रदेशाचा पुरेपुर वापर करुन युध्द लढण्याची नवीन पद्धतीचा वापर केला. छत्रपती

शिवाजी महाराजांनी साडेतीनशे वर्षापूर्वी अंमलात आणलेली युध्दनीती पाहता आज 21व्या शतकातील महासत्ता, अमेरिका, जपान, चीन सुध्दा आपल्या कित्येक शतके मागे आहेत हे अभ्यासांती स्पष्ट होते. म्हणजे छत्रपती शिवाजी राजे किती भौगोलिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दुरदृष्टीचे राजे होते हे स्पष्ट होते.

मराठ्यांच्या युध्दपध्दतीच्या संदर्भात होत असल्याने गनीम म्हणजे मराठा असा अर्थ निघतो. (संदर्भ –गनिमी कावा लेखक – अरविंद नंदकुमार ढेकणे) गनिमा कावा ही संज्ञा मराठ्यांच्या शत्रुंनी मराठ्यांच्या युध्दपध्दतीसाठी योजिले हे स्पष्ट आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वापर केलेल्या युध्दनितीचे, युध्दतंत्राचे स्वरुप विशद करण्यापुर्वी गनिमीकावा या शब्दप्रयोगाच्या मुळाशी असलेला संकल्पना, अर्थ अनर्थ असे आहेत. गनीम हा मूळ शब्द फारशी भाषेतला असून गनिमी हे त्या शब्दाचे षठ्यंतरुप आहे. कावा या शब्दाला लक्षणेने फसवणुक, धोकेबाज, कपट हे अर्थ आले आहेत. गनिमी कावाचा अर्थ शत्रुवरचा कपटयुक्त हल्ला अथवा कपटयुध्द असा होतो.

छत्रपती शहाजी राजांनी निजामशाहीच्या अखेरच्या दिवसा ह्या युध्दपध्दतीचा वापर केला होता.

स्वराजाचा पाया उभारतांना आदिलशाही मुघलशाही, सिध्दी, पोर्तुगीज, इंग्रज, फेंच आणि डच या सारख्या बलाढ्य शत्रुंशी एकाचवेळी अनेकांशी संघर्ष करावा लागला. या ऐतिहासिक घटनेचा मागोवा घेत असता आपणास असे लक्षात येते की, छत्रपती शिवाजी महाराज हे स्वत: शूर योद्धा, उत्कृष्ट रणनीतीकार, कुशल संघटक आणि सामाजिक आणि भौगोलिक परिसराचे जाणते राजे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी निर्माण केलेली सैन्य रचना, सैन्य व्यवस्थापन आणि प्रभावी युध्दनीतीचा अवलंब छत्रपती शिवाजी महाराजांनी शिस्तबध्द सैन्य रचनेमुळे व प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराजांच्या सर्व मोहिमामध्ये हमखास यश लागले होते. त्यामुळे महाराजांच्या सैन्यात जबरदस्त आत्मविश्वास होता. महाराज स्वत: प्रत्येक लढाईत स्वत: असल्यामुळे नियोजन आणि अंमलबजावणी यात यत्किंतही फरक नसे.

महाराजांची सैन्य व्यवस्था दोन प्रकारे एक बारगिर आणि दुसरी शिलेदार. बारगिर म्हणजे सरकार तिजोरीतुन सैन्य प्रशिक्षण, पागा खर्च, पगार आणि खडे सैन्य. दुसरे शिलेदार

पगार आणि बक्षिस मिळत असे परंतु हे दोन्ही एकदिलाने एकनिष्ठेने कोणतीही मोहित फते करायचे. महाराजांच्या फौजेचा साठ टक्के भाग घोडदळांचा आणि चाळीस टक्के भाग पायदळाचा. घोडदळांनी शत्रुच्या प्रदेशात विद्युत वेगाने हल्ला करायचा आणि पायदळाने शत्रुवर अमंल प्रस्थापित करायचे.

महाराजांच्या प्रत्येक यशात मोलाचा आणि सिंहाचा वाटा होता ते म्हणजे गुप्तहेर यंत्रणेचा. गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनीती हे शिवाजी महाराजांचे एकाच नाण्याच्या दोन बाजु होती.

संशोधनाची निवड :

महाराष्ट्रात सुमारे चारशे वर्षापूर्वी विजापूरचा आदिलशहा, अहमदनगरचा निजामशहा या दोन सुलतानांनी आपासात सत्तासंघर्षात प्रजेवर अमानुष अत्याचार आणि जुलुम करत होते. प्रजा सुखी नव्हती छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजही आपल्या देशाला लागु पडतात. महाराष्ट्रातील अनेक इतिहासकार, लेखकांनी शिवरायांच्या कर्तव्यापुढे हिमालयही ठेंगना आहे. असे त्यांच्या लिखानातून मांडले आहे. महाराजाच्यां कार्यकर्तृत्वातून त्यांचे शौर्य, धैर्य साहस, पराक्रम अशा अनेक गुणांचा, विचारांचा प्रसार–प्रचार व्हावा,त्यांची युध्दनीती, गुप्तहेर यंत्रना जगातील अनेक देशातील युध्दविश्लेषक, युध्द अभ्यासक, युध्द कौशल्याचे धडे घेत आहेत.

जगात कायम स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुल्ये देशात रुजुविता येईल. त्यामुळे भारताला छत्रपती शिवाजी महाराजांची **युध्दनीती आणि गुप्तहेर यंत्रणेचा** यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधनाकरिता विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन समस्या:“छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनीती” – एक ऐतिहासिक अभ्यास

विषयाचे महत्त्व : जगात अनेक राजे, महाराजे होऊन गेले पण छत्रपती शिवाजी महाराजांचे चातुर्त्य, संयम, सहनशिलता, जीवघेण्या प्रसंगात सुध्दा अतिशय शांत डोक्याने समस्येचे समाधान कसे करावे हे आपल्या भावी पिढीला सांगता येईल. एवढेच नव्हे तर युध्दनितीपेक्षा रणनीती, भेदनीती, दंडनीती आणि हेरनीती तंत्राने राष्ट्र आणि समाजात परिवर्तन करु शकतात.

आजही छत्रपती शिवाजी महाराजांचे विचारांचा पाहिजे तेवढा प्रसार– प्रचार झालेला दिसत नाही. म्हणून संशोधकाला काही शिफारसी करता याव्यात या निर्मळ हेतूने संशोधकाला हा विषय महत्वाचा वाटतो.

या संशोधकाच्या माध्यमातुन राष्ट्राला, समाजाला महापुरुषांच्या पराक्रमाची, त्यांच्या शौर्याची मुल्यांची आणि त्यांच्या कार्यातून राष्ट्रभावना जागृत करण्यासाठी खऱ्या अर्थाने जाणून घेण्यास मदत होईल.

शत्रू आपल्यापेक्षा कितीही बलाढ्य आणि सामर्थ्यवान असला तरी गुप्तहेर यंत्रणेच्या आणि युध्दनीतीच्या जोरावर आपण शत्रुवर वर्चस्व प्रस्थापित करु शकतो.

संशोधनाचे उद्दिष्टे :

1) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तव्याचा अभ्यास करणे.

2) छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकालीन परिस्थितीचा अभ्यास करणे.

3) छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा समाजावर झालेला परिणाम.

4) छत्रपती शिवाजी महाराजांची युध्दनीती आणि गुप्तहेर यंत्रनाचा अभ्यास करणे.

5) छत्रपती शिवाजी महाराजांचे राष्ट्रप्रेम, राष्ट्रभावन यांचा अभ्यास करणे.

6) छत्रपती शिवाजी महाराजांच्या युध्दनितीचा अभ्यास करणे.

7) छत्रपती शिवाजी महाराजांचे गुप्तहेर यंत्रनेचा अभ्यास करणे.

8) छत्रपती शिवाजी महाराजांचे तत्कालीन अनेक शत्रुचा गुप्तहेरच्या माध्यमातुन विजय मिळविले याचा अभ्यास करणे.

9) छत्रपती शिवाजी महाराजांचे गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनीती यांचा समन्वयाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

1) छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक शत्रुशी मुकाबला करत स्वराज्य स्थापन केले.

2) छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रत्येक लढाईसाठी वेगवेगळी युध्दनीती अवलंबिली.

3) छत्रपती शिवाजी महाराजांनी बलाढ्य शत्रुंशी मुकाबला करताना आपल्या सक्षम गुप्तहेर यंत्रणेचा मुत्सुदीगिरीने वापर करुन बलवान शत्रुलाही कशा पध्दतीने नमविले हे गुपित जाणून घेणे.

4) छत्रपती शिवाजी महाराजांची युध्दनीती मागील नैतिक बाजू व उदात्त तत्वांचा उलगडा करणे.

संशोधनाची पध्दती :

इतिहासामध्ये विविध संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येत असला तरी प्रस्तुत संशोधनाकरीता ऐतिहासिक, वर्णनात्मक व विशेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात येईल.

संशोधन सामुग्री :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला जाईल. ज्यामध्ये पुराभिलेखागारातील कागदपत्रे, पत्रव्यवहार व आत्मचरित्रे सरकारी कागदपत्रे, संदर्भग्रंथ, प्रसिध्द साहित्य, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादी साधनाद्वारे उपलब्ध माहितीच्या आधारे संशोधन कार्य करण्यात येईल.

संशोधनाची व्याती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनात छत्रपती शिवाजी महाराजांवर व त्यांच्या कार्यावर विपुल प्रमाणात लेखन झालेले असुन त्यांचा विचारांचा प्रभाव खूप मोठ्या भागावर झालेला आहे. परंतु संशोधनात फक्त युध्दनीती, गुप्तहेर यंत्रणा मुळे बलाढ्य सत्ता आणि सरदार यांचे पानीपत कशाप्रमारे केले

।। प्रकरण नियोजन ।।

– प्रस्तावना

प्रकरण पहिले – छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रारंभिक जीवन :

प्रस्तुत प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म तत्कालिन महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल. त्याच बरोबर महाराष्ट्रातील परकीय आक्रमणे, शहाजीराजे यांचे मुळ घराण्याचा इतिहास नमूद केला जाईल. तसेच शहाजी राजांचे मुघलशाहीतून आदिलशाहीत सत्तांतरण करण्याची मागची परिस्थिती मांडली जाईल. शहाजी राजे भोसले आणि माँ जिजाऊ या विवाह प्रसंगाची आणि इतर घटनांचा आढावा घेण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म, बालपण, शिक्षण आणि महाराजांच्या वैयक्तीक जीवनातील महत्वाच्या प्रसंगाची नोंद घेतील. बाल शिवरायांची रायरेश्वरांच्या मंदिरातील **स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा** या ऐतिहासिक घटनांची संशोधनात आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे – छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा :

दुसऱ्या प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर विभागाची स्थापना, पार्श्वभूमी आणि पूर्व इतिहास त्याचबरोबर गुप्तहेरांची सांकेतीक भाषा, खूणा, कार्यप्रणाली आणि स्वरुप कसे होते या सर्व गुप्तहेरांचा परामर्श घेण्यात येईल. गुप्तहेरांची नेमणूक, पगार, बक्षीस त्याच बरोबर फितुर झाल्यास जबर शिक्षा आणि वेळप्रसंगी कडेलोट शिक्षेची फर्मान या सर्व घटनांचा लेखनातून विशद केला जाईल.

स्वराजाच्या तिसरा नेत्र गुप्तहेर यंत्रणेचा प्रमुख बर्हिजी नाईक व इतर साथीदारांची कार्यशैली आणि विविध गुणांच्या व्यक्तीमत्वाचा शोध घेण्यात येईल.

महाराजांच्या प्रत्येक मोहिमेपूर्वी गुप्तहेर यंत्रणेशी सल्लामसलत, रणनिती नंतरच महाराज मोहिमेचा अंतिम निर्णय घेत असे. शत्रुची बलस्थाने आणि कमकुवतपणा या गोष्टी विचारात घेऊन तसेच वेळप्रसंगी शत्रुच्या तंबुत खोटी बातमी पेरुन दिशाभूल करीत असे. महाराजाच्या प्रत्येक मोहिमेतील गुप्तहेर यंत्रणेचे यश आणि अपयश यांचा सखोल घटनांची कारणमिमांसा या संशोधनात केली जाईल.

महाराजांची गुप्तहेर यंत्रणा जलद, विश्वासू आणि सक्षम कशी होती यांचा सर्व पैलूनी या संशोधनात आढावा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे – छत्रपती शिवाजी महाराजांची युध्दनीती

छत्रपती शिवाजी महाराजांना युध्दनितीचा आणि युध्दकौशलाचा वारसा त्यांचे वडील शहाजी राजेंकडून बालपणीच मिळाला होता. महाराजांची सैन्यरचना, सैन्य व्यवस्थापनातील कौशल्यामुळे प्रत्येक मोहिमेत हमखास यश मिळत असे. युध्द मोहिमेमध्ये रणांगणाची निवड कशी व केव्हा केली याचा आढावा घेतला जाईल.

युध्दनितीमध्ये संख्या सैन्यबलाबरोबरच, भौगोलिक स्थान, पर्वत, नदी, जंगल, गड–किल्यांचे अनन्य साधारण महत्व कसे होते यांचा युध्दक्षेत्रात पुरेपुर आणि अनुकुल कसा केला या सर्व घटनांची नोंद येथे घेतली जाईल. महाराजांची प्रत्येक मोहिम तत्कालीन सत्ताधीशापेक्षा भिन्न आणि विकसित होती. महाराजांने पारंपारीक युध्द पध्दतीचा त्याग करुन नवीन पध्दतीचा अर्थात **गनिमी कावा** या नवीन युध्दनीतीचा स्विकार केला होता.

छत्रपती शिवाजी महाराज स्वत: युध्द नेतृत्व करीत असल्यामुळे निर्णय, अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष कार्यवाही यात यत्किंचीतही फरक पडत नसे त्यामुळे महाराजांची प्रत्येक मोहिम यशस्वी व्हायची आणि सैन्यामध्ये त्याग, बलिदान आणि प्रचंड आत्मविश्वास होता. या सर्व युध्द कौशल्याची माहिती येथे घेतली जाईल.

महाराजांची युध्दनिती, युध्दकौशल्य आजही जगातील सर्व युध्द अभ्यासकांना करण्याची गरज वाटते. या सर्व ऐतिहासिक प्रसंगाची नोंद घेतली जाईल.

प्रकरण चौथे – छत्रपती शिवाजी महाराजांची युध्दनीतीतील गुप्तहेर यंत्रणाचे योगदान

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्यक्ष युध्दपुर्वी गुप्तहेर यंत्रणेची कोणती भूमिका आणि कार्यवाही करायची याचा संशोधनात आढावा घेतला जाईल.

छत्रपती शिवाजी महाराज आज कोणत्या मोहिमेवर जाणार आहेत याची माहिती फक्त गुप्तहेर यंत्रणा प्रमुख आणि बर्हिजी नाईक आणि निवडक व विश्वासू लोकानांच माहित असे आणि मोहिमची कमालाची गुप्तता ठेवत असे. या कारणांचा आढावा घेतला जाईल.

स्वराज्यावरील पहिले संकट अफजलखानाचा वध इ.स.1659 या युध्दनितीतील गुप्तहेर यंत्रणेच्या यशाच्या कारणांचा शोध घेतला जाईल. त्याच बरोबर पावनखिंडची लढाई इ.स.1660, उंबरखिंडीची लढाई इ.स.1661, शाहिस्तेखानावरील हल्ला इ.स.1663, सुरतेचा पहिला पुर्वनियोजीत छापा इ.स.1664, सुरतेचा दुसरा छापा इ.स.1670, सिंहगढाचा लढा इ.स.1670 आणि इतिहासाकाराच्या मते आग्र्याहून सुटका ही शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील गुप्तहेर यंत्रणेतील सर्वोच्च यशाचा या ऐतिहासिक घटनांचा सविस्तर या संशोधनात आढावा घेतला जाईल.

महाराजांच्या अगणित मोहिमेमध्ये गुप्तहेर यंत्रणाबरोबर युध्दनितीतील मुत्सदेगिरी, रणनिती, डावपेच आणि वेळप्रसंगी तह या युध्दकौशल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज बलाढय शत्रुंना सामोरे कसे गेले या सर्व घटनांचा संशोधनात आढावा घेतला जाईल.

गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनिती या एकाच नाण्यांच्या दोन बाजूंचा तर्कसंगत पध्दतीने आढावा घेतला जाईल.

निष्कर्ष व शिफारशी

वरील चारही प्रकरणाचा वस्तुनिष्ठ, तर्कसंगत आणि शास्त्रशुध्द पध्दतीने आढावा घेऊन समकालीन प्राथमिक साहित्य, अस्सल बखरी, महाराजांचे आज्ञापत्रे, सनदा, आंतरराष्ट्रीय संशोधन लेख आणि नामवंत इतिहासकाराचा संदर्भ लेखनाच्या आधारे ऐतिहासिक घटनांचा आढावा घेतला जाईल.

महाराजांची गुप्तहेर यंत्रणा आणि युध्दनितीतील कौशल्याद्वारे मुघलशाही, आदिलशाही, निजामशाही त्याचबरोबर फ्रेंच, डच, इंग्रज आणि पोर्तुगीज या सर्व बलाढ्य शत्रुंना पराजित करुन त्यांच्यावर अंकुश कसा ठेवला या सर्व घटनांचा अभ्यास करुन वस्तुनिष्ठपणे निष्कर्ष येथे मांडण्यात येतील.

।। संदर्भ ग्रंथ ।।

1) प्रा.नामदेवराव जाधव, शिवराय, राजमाता प्रकाशन, आठवी आवृत्ती, मुंबई. 13 ऑक्टोबर 2013.

2) रंजीत देसाई, श्रीमानयोगी, मेहता पब्लिकेशन, 1 जानेवारी 1968.

3) गजानन भास्कर मेहंदळे, शिवछत्रपतींचे आरमार, परममित्र प्रकाशन.

4) कृष्णाराव अर्जुन केळुस्कर, छत्रपती शिवाजी महाराज, साकेत प्रकाशन.

5) प्रा.नामदेवराव जाधव, शिवाजी द मॅनेजमेंट गुरु, राजमाता प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती 6 जून 2011

6) प्रा.नामदेवराव जाधव, गनिमी कावा, राजमाता प्रकाशन मुंबई.

7) कॉ.गोविंद पानसरे, शिवाजी कोण होता ? लोकायत प्रकाशन, 59 आवृत्ती मुंबई 1988.

8) डॉ.पी.एस.जगताप, रयतेचा राजा, शिवछत्रपती पब्लिकेशन प्रथम आवृत्ती 2016.

9) डॉ.पी.एस.जगताप, शिवरायांचे युध्दकौशल्य, वर्धा प्रकाशन.

10) विजय देशमुख, शककर्ते शिवराय, सन पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती, 15 डिसेंबर 1986

11) प्रेम धांडे, शिवनेत्र बर्हिजी नाईक, रुद्रा एंटरप्राईजेस, प्रथमावृत्ती 2021.

12) गोविंद सखाराम सरदेसाई, मराठी रिसायत खंड 1 ते 8, पापुलर प्रकाशन, 1 जानेवारी 2012.

13) आर्य चाणक्य, कौटिल्य अर्थशास्त्र, विकीपिडीया.

14) Ninad Bedekar The Timeless Management principal Continetal Publication 1 Jan 2015.

15) Gajanan Baskar Mehendale, Shivaji Life & His Time Parmmitra Prakashan 2011.

✻ संशोधक विद्यार्थी ✻
सुरेश नारायण गुरजलवाड
मो.9921437642

संशोधक मार्गदर्शक
प्रा.डॉ.बावळे नितीन पांडुरंग
सहयोगी प्राध्यापक (इतिहास विभागप्रमुख)
शारदा महाविद्यालय, परभणी
मो.9422110489